खटला दाखल तारीख : १९/११/२०२४
खटला निकाल तारीख : १५/०५/२०२६
कालावधी : ०१ व. ०५ म. २६ दि.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : वि. प्र. खंदारे)

**CNR No. : MHWR030072762024** **म.कौ.हिं.प्र.का. अर्ज क्र. १६२/२०२४**

**नि.क्र. : १६**

१. मुमताज अब्दुल कलाम नईम शेख,
वय : ३२ वर्षे, धंदा : काहीही नाही,

२. अमरीन अब्दुल कलाम शेख,
वय : ०७ वर्षे, धंदा :

३. अरमान अब्दुल कलाम शेख,
वय : ०४ वर्षे, धंदा :

सर्व रा. वार्ड नं. २, सेवाग्राम, नांदोरा रोड,
वर्धा, तह. जि. वर्धा. ... **अर्जदार**

**विरूध्द**

अब्दुल कलाम नयीम शेख,
वय : २४ वर्षे, धंदा : रोजमजुरी,
रा. क्यालरी वार्ड, वरोरा,
ता. वरोरा, जि. चंद्रपुर. ... **गैरअर्जदार**

.....................................................................................................

*वादकथनाकरीता उपस्थिती* :

अर्जदारातर्फे विद्वान वकील : श्रीमती आर. आर. नाईक.

प्रकरण गैरअर्जदारांविरूध्द एकतर्फा चालविण्यात आले.

.....................................................................................................

**न्यायनिर्णय**

( घोषित दिनांक १५/०५/२०२६ )

प्रस्तुत प्रकरण संरक्षण अधिका—यांमार्फत महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंध कायद्याचे (थोडक्यात 'कौ. हिं. कायदा') कलम १२ अंतर्गत दाखल करण्यात आलेले आहे.

अर्जदाराचे कथन संक्षिप्तरित्या खालीलप्रमाणे :

२. अर्जदाराने कथन केले आहे की, गैरअर्जदार तिचा पती आहे. त्यांचे दि. २५/०५/२०१६ रोजी त्यांचे रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले होते आणि त्यानंतर ती गैरअर्जदारासोबत तिचे सासरी मौजा वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपुर येथे नांदत होती. त्यादरम्यान तिने अर्जदार क्र. २ व ३ यांना जन्म दिला.

३. तिने पुढे कथन केले की, लग्नानंतर अंदाजे एक वर्ष गैरअर्जदाराने तिला चांगले नांदविले, परंतु त्यानंतर तो तिला त्रास देत होता. तो दररोज दारू पिवून येवून तिला शुल्लक कारणावरून शिवीगाळ करत होता व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होता. तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला शेजारच्या लोकांशी बोलु देत नव्हता व कधी कधी घराबाहेर काढून देत होता. तो तिच्या आईवडीलांना अश्लील शिवीगाळ करत होता, घरातील वस्तुंची फेकफाक करत होता आणि कधी कधी तिचे केस पकडून तिचे डोके भिंतीवर आपटत होता. तसेच घरातील शिजलेले अन्न सुध्दा फेकुन देत होता. त्यामुळे मुलांना सुध्दा उपाशी राहावे लागत होते.

४. तिने पुढे कथन केले की, गैरअर्जदाराचा शारिरीक व मानसिक त्रास वाढत गेल्याने हताश व निराश होवून ती एप्रिल २०१९ मध्ये मुलांसह माहेरी गेली होती. त्यावेळी गैरअर्जदाराने तेथे येवून तिची माफी मागितली आणि यापुढे मारहाण व शिवीगाळ करणार नाही अशी ग्वाही दिली होती. त्यामुळे ती पुन्हा त्याचेसोबत नांदायला गेली होती. परंतु काही दिवसांनी तो पुन्हा तिला दारू पिवून शिवीगाळ व मारहाण करत होता. तसेच दि. २८/०१/२०२० रोजी तो तिला न सांगता अचानक त्याचे गावी निघून गेला आणि तेव्हा पासून त्याने अर्जदारासोबत कोणताही संपर्क ठेवला नाही. तसेच तिच्या व मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पार पाडली नाही.

५. तिने पुढे कथन केले की, तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही आणि ती तिचे आईवडीलांचे दयेवर जीवन जगत आहे. त्याउलट गैरअर्जदार रोजमजुरीचे काम करतो व त्यास रूपये ३०,०००/— मिळतात. त्यामुळे ती प्रस्तुत अर्जाव्दारे गैरअर्जदाराविरूध्द एकुण रूपये १३,०००/— पोटगी आणि नुकसान भरपाईपोटी रूपये १ लाख मिळण्याची मागणी करत आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नि.क्र. ०९ वरील अहवालानुसार गैरअर्जदाराला पाठविण्यात आलेली नोटीस *'विनातामील'* परत आली. तसेच त्यानंतर सुध्दा तो न्यायालयात हजर राहण्यास असमर्थ ठरला आणि

त्याबाबत कोणतेही कारण नमुद केले नाही. त्यामुळे नि.क्र. ०१ वरील दि. १२/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत प्रकरण गैरअर्जदाराविरूध्द एकतर्फा चालविण्यात आले. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदारातर्फे प्रकरणात होवून सदर आदेश रदद करण्याबाबत अथवा प्रकरण चालविण्याबाबत कोणतेही प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येत नाही. करीता प्रकरण गैरअर्जदाराविरूध्द एकतर्फा चालविण्यात आले.

७. अर्जदाराच्या कथनाचे अनुषंगाने खालील नमुद मुद्दे माझ्या विचाराधीन असून त्याबाबतची कारणमिमांसा व निष्कर्ष येणेप्रमाणे :

| **अनु. क्र.** | **विचाराधीन मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने हे सिध्द केले काय की, ती व गैरअर्जदार हे कौटुंबिक नात्यात आहेत ? | ... होय. |
| २. | अर्जदाराने हे सिध्द केले काय की, गैरअर्जदाराने तिचा कौटुंबिक छळ केला ? | ... होय. |
| ३. | अर्जदार ही तिने मागणी केलेल्या पोटगीच्या प्रार्थनेस पात्र आहे काय ? | ... अंशतः होय. |
| ४. | अर्जदार ही तिने मागणी केलेल्या नुकसान भरपाईच्या प्रार्थनेस पात्र आहे काय ? | ... अंशतः होय. |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज अंशतः मंजूर. |

<u>अर्जदारातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा गोषवारा</u> :

८. अर्जदारातर्फे आपली बाजु सिध्द करण्याकरीता केवळ स्वतः म्हणजे सा.क्र. १ मुमताज अब्दुल कलाम नईम शेख हिची ई—फाईल्ड साक्ष नि.क्र. ११ वर नोंदविली आहे. अर्जदाराने नि.क्र. १२ ते १४ वरील ई—फाईल्ड आधार कार्ड हा कागदोपत्री पुरावा सादर केला. त्यानंतर अर्जदाराने दि. १०/०४/२०२६ रोजीचे ई—फाईल्ड पुरसिस नुसार आपला पुरावा बंद केला.

९. प्रकरण गैरअर्जदाराविरूध्द एकतर्फा चालविण्यात आल्याने त्याचेमार्फत कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

१०. अर्जदाराचे विद्वान वकिलांनी नि.क्र. १५ वरील लेखी युक्तीवादाच्या अनुषंगाने युक्तीवाद केला की, अर्जदाराने तिचे अर्ज व पुराव्यामध्ये तिच्यावर

झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत विगतवार कथन केलेले आहे. गैरअर्जदारातर्फे अर्जदाराचा उलटतपास घेण्यात न आल्याने तिची साक्ष अबाधीत ठरते आणि त्यावरुन अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द होते. तसेच अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही आणि गैरअर्जदाराने तिचे व तिच्या मुलांचे उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे मुबलक साधन आहे आणि त्यामुळे तो अर्जदारास पोटगी भत्ता देण्यास बांधील आहे. करीता त्यांनी अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

११. वर नमुद केल्याप्रमाणे प्रकरण गैरअर्जदाराविरूध्द एकतर्फा चालविण्यात आल्याने त्याचेतर्फे प्रकरणात युक्तीवाद करण्याचे कोणतेही प्रयत्न करण्यात आलेले नाही. करीता प्रकरण गैरअर्जदाराचे युक्तीवादाविना चालविण्यात आले.

## कारणमीमांसा व निष्कर्ष

### मुद्दा क्र. १ च्या संदर्भात :

१२. अर्जदारातर्फे सा.क्र. १ मुमताज ही प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार व पिडित असून तिने तिच्या अर्जात व पुराव्यात कथन केले आहे की, गैरअर्जदार तिचा पती आहे. तसेच लग्नानंतर ती गैरअर्जदारासोबत तिचे सासरी वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपुर येथे राहत होती. गैरअर्जदारातर्फे त्याचे अर्जदारासोबतचे नाते व ती लग्नानंतर त्याच्यासोबत एकत्र राहत असल्याबाबत कोणताही विसंगती दर्शक पुरावा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचे कथन अबाधीत ठरते व ते विश्वासार्ह आहे. त्यामुळे कौ. हि. कायदाचे कलम २(फ) नुसार अर्जदार व गैरअर्जदार कौटुंबिक नात्यात येतात. करीता, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

### मुद्दा क्र. २ च्या संदर्भात :

१३. अर्जदारातर्फे सा.क्र. १ मुमताज हिने तिच्या साक्षीत पुढे कथन केले आहे की, ती गैरअर्जदारासोबत राहत असतांना तो तिचा कौटुंबिक छळ करत होता. तिने सरतपासामध्ये तिच्या अर्जातील नमुद बाबींचा पुर्नउल्लेख करुन त्याअनुषंगाने पुरावा दिला आहे. गैरअर्जदारातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात न आल्यामुळे तिचे कथनाबाबत विसंगती दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे सदर कथन अबाधीत ठरते व ते विश्वासार्ह ठरते. तसेच त्यास अभिलेखावरील कौटुंबिक घटना अहवालाव्दारे दुजोरा मिळतो. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदारावर शारिरीक व मानसिक छळ केल्याचे निष्पन्न होते आणि

त्याद्वारे अर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सुध्दा सिध्द होते. करीता, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात</u> :**

१४. अर्जदाराने तिच्या साक्षी पुराव्यात कथन केले आहे की, गैरअर्जदाराने तिच्या व मुलांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी स्विकारलेली नाही. तसेच, तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्याउलट गैरअर्जदार रोजमजुरीचे काम करतो व त्यास दरमहा रूपये ३० हजार मिळतात. त्यामुळे ती त्याचेकडून दरमहा एकूण रूपये १३,०००/— पोटगी मिळण्याची मागणी करत आहे.

१५. अर्जदारातर्फे नि.क्र. ०७ वर तिचे मत्ता व दायित्वाचे घोषणेचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यामध्ये तिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमुद केलेले आहे. गैरअर्जदारातर्फे अर्जदाराला उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कोणताही विसंगतीदर्शक पुरावा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन नसल्याचे व ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द होते. तसेच गैरअर्जदार तिचा पती असल्याने तिचे पालनपोषण करण्याची त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१६. हे येथे उल्लेखनिय ठरते की, अर्जदारातर्फे गैरअर्जदार नोकरी अथवा कामधंदा करतो याबाबत कोणताही दस्त सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराची अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे पोटगी रक्कम देण्याची पात्रता असल्याचे दर्शविणारा कोणताही दस्त अभिलेखावर सादर अथवा सिध्द करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत तो अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे रक्कम देवू शकतो हे सिध्द होत नाही.

१७. हे सुध्दा येथे उल्लेखनिय ठरते की, अर्जदाराने तिला दरमहा रूपये १३,०००/— नेमक्या कोणत्या गरजा भागविण्याकरीता आवश्यक आहे याचा तपशील दिलेला नाही. त्यामुळे तिला दरमहा एकूण रुपये १३,०००/— आवश्यक असल्याचे सिध्द होत नाही. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराची सदर रक्कम देण्याची क्षमता असल्याचे सुध्दा निष्पन्न होत नाही. गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर पुरावा नसल्याने त्याचे एकूण उत्पन्न निष्पन्न होत नाही.

१८. परंतु गैरअर्जदार सुदृढ असून अर्जदाराचे कथनाप्रमाणे तो रोजमजुरीचे

काम करतो. त्यामुळे मजुरीव्दारे दरडोई उत्पन्नाची किमान संकल्पना लक्षात घेवून त्यावरुन तो काम करुन उत्पन्न मिळवीत असल्याची बाब नाकारता येणार नाही.

१९. अश्या परिस्थितीत सामान्य दिनमानामध्ये सरासरी एक व्यक्ती किमान रुपये ३००/— ते ५००/— मजुरी कमवित असल्याचे गृहित धरता येईल. त्यामुळे दोन्ही बाजुंचे समाजातील स्थान, आर्थिक व सामाजिक बाबी व उदरनिर्वाहाकरीता आवश्यक बाबींचे अवलोकन केले असता, माझ्या मते अर्जदाराला तिचे उदरनिर्वाहाकरीता दरमहा रूपये ४,०००/— आणि मुलांच्या उदरनिर्वाहाकरीता दरमहा प्रत्येकी रूपये १,०००/— पोटगी भत्ता देणे पुरेसा व योग्य ठरेल. करीता मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात</u> :**

२०. अर्जदाराने गैरअर्जदारांकडून रुपये १ लाख नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे, परंतू अर्जदाराने तिचे सदर नुकसान झाल्याचे आणि ते गैरअर्जदारामुळे झाल्याचे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे ती सदर नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. परंतु अर्जदार तिचेवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द करण्यास यशस्वी ठरली आणि तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नसल्याने ती त्या प्रमाणात नुकसान भरपाई व अर्जाचा खर्च मिळण्यास पात्र आहे. करिता, मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात</u> :**

२१. वर नमुद निष्कर्षांवरून अर्जदार तिने केलेल्या मागणीस अंशतः पात्र आहे. करीता, मी मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराला याद्वारे निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदारावर कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये.

३. गैरअर्जदाराला याव्दारे हे सुध्दा निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदारास तिचे व मुलांचे उदरनिर्वाहाकरीता प्रस्तुत अर्जाच्या दिनांकापासून (अर्जदाराकरीता दरमहा रूपये ४,०००/— आणि मुलांच्या उदरनिर्वाहाकरीता दरमहा प्रत्येकी रूपये १,०००/—) असा

दरमहा एकूण रुपये ६,०००/— पोटगी भत्ता दयावा.

४. तसेच गैरअर्जदाराने अर्जदारास नुकसान भरपाई आणि प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून एकूण रुपये २५,०००/— दयावे.

५. या न्यायनिर्णयाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

६. या न्यायनिर्णयाची प्रत संबंधित संरक्षण अधिकारी व पोलीस स्टेशन अधिकारी यांना माहितीस्तव अग्रेषित करण्यात यावी.

(न्यायनिर्णय सर्वांसमक्ष न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला.)

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.05.15 15:46:36 +0530

दिनांक : १५/०५/२०२६

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्रमाणपत्र</u>**

या पी. डी. एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जितेंद्र हि. जावळे, |
| कोर्टाचे नाव | : | श्री. वि. प्र. खंदारे,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.<br>(फौजदारी न्यायालय क्र. १) |
| पीठासीन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | : | १५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख | : | १५/०५/२०२६ |

स्वा/—

दिनांक : १५/०५/२०२६

ठिकाण : वर्धा

(जि. हि. जावळे)
लघुलेखक ग्रेड ३
प्रथमवर्ग न्यायालय क्र. १, वर्धा